## निवडक

### केरी - फोंडा ग्रामपंचायतीची २७ रोजी ग्रामसभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेर, दि. १९ :** केरी - फोंडा येथील केरी ग्रामपंचायतीची ग्रामसभा रविवार दि. २७ रोजी सकाळी ९.४५ वाजता येथील ग्रामपंचायत सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.ग्रामस्थांना काही प्रस्ताव मांडावयाचे असल्यास दि. २४ एप्रिलपर्यंत मांडावेत, असे कळविण्यात आले आहे. तरी या सभेला सर्व ग्रामस्थांनी उपस्थित रहावे असे आवाहन सरपंचा तृप्ती नाईक यांनी केले आहे.

---

### मोरेश्वर स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लबतर्फे ७ मे पासून हेवी टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १९ :** येथील मोरेश्वर स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लबतर्फे अखिल गोवा पातळीवर फ्लडलाईट हेवी टेनिस बॉल आमदार गोविंद गावडे चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली असून सदर स्पर्धा ७, ८, ९, १० व ११ मे पर्यंत रात्रीची सावईवेरे येथील पंचायत मैदानावर खेळविली जाणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या संघास रु. ५० हजार, उपविजेत्या संघास रु. २५ हजार, उपांत्य सामन्यात पराभूत संघांना प्रत्येकी १० हजार रुपये देण्यात येतील. नावनोंदणी व अधिक माहितीसाठी संदेश (९८२२१८४०८४) किंवा प्रमोद (९८२३६५८५९५) यांच्याशी संपर्क साधावा असे आयोजकातर्फे कळविण्यात आले आहे.

---

### साळ ग्रामपंचायतीची २७ रोजी सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १९ :** ग्रामपंचायत साळ च्या मतदार यादीत नावे असलेल्या सर्व मतदारास जाहीर कळविण्यात येते की साळ ग्रामपंचायत ची सर्वसाधारण ग्रामसभा रविवार दि. २७ रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालय - साळ या ठिकाणी घेतली जाईल. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे असे विनंती आहे. या ग्रामसभेसमोर कोणत्याही सदस्याला त्याचा/तिचा प्रस्ताव/ ठराव सादर करायचा असेल तर त्यांनी बुधवार दि. २३ रोजीच्या आत सरपंच किंवा उपसरपंच यांच्या स्वाधीन लेखी स्वरुपात मांडाव्यात. या ग्रामसभेत खालील विषयावर चर्चा होईल. मागील सर्व साधारण ग्राम सभेचे प्रोसिडिंग वाचून मंजूर करणे. विविध सरकारी योजनासाठी लाभार्थीकडून आलेल्या अर्जावर चर्चा करून निर्णय घेणे, सन २०२५-२०२६ सालच्या अंदाज पत्रकास मंजूरी देण्याबाबत, सन २०२४ - २०२५ सालच्या सुधारित अंदाज पत्रकास मंजूरी देण्याबाबत, सन २०२४ - २०२५ सालच्या जमाखर्चाचे वाचन, सन २०२४ - २०२५ सालच्या प्रशासकिय अहवालास मंजुरी देण्याबाबत, राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत करावयाच्या कामासंबंधी चर्चा करणे, जैव विविधता व्यवस्थापन समितीचा कार्य अहवाल सादर करणे, मतदारांकडून आलेल्या विकास कामांच्या पत्रावर/ ठरावांच्या अर्जावर चर्चा करून निर्णय घेणे तरी साळ ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व मतदारांनी वेळेवर उपस्थित राहून ग्रामसभा यशस्वी करावी असे साळ सरपंच सावित्री साजरो घाडी यांनी प्रसिद्ध केले आहे.

---

### हरमल येथे आज 'मी नथुराम गोडसे बोलतोय'

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १९ :** श्री सिद्धेश्वर संस्था आयोजित प्रदीप दळवी लिखित व नाट्य प्रशिक्षक संजय मयेकर दिग्दर्शित व संकल्पित 'मी नथुराम गोडसे बोलतोय' नाटक रविवार २० एप्रिल रोजी संध्याकाळी ७.३० वाजता माऊंट कार्मेल मल्टिपर्पज हॉल हरमल येथे आयोजित केल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष संजय मयेकर यानी दिली.

तत्पूर्वी या उद्घाटन सोहळ्यास पेडणे उपजिल्हाधिकारी शिवप्रसाद नाईक तसेच खास निमंत्रित अनिल राणे देसाई उपस्थित राहणार आहेत. तसेच संस्थेचे निर्मिती प्रमुख उद्देश पेडणेकर,सचिव श्वेता भास्कर नाईक रामजी, खजिनदार हर्षदा लवु गोकर्णकर आदी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर नाटक सादर होणार असल्याचे अध्यक्ष संजय मयेकर यानी सांगितले. तरी नाट्य रसिकांनी उपस्थित राहावे व सहकार्य करण्याचे आवाहन मयेकर यानी केले आहे.

# जोस बटलरचे तुफानी अर्धशतक

## गुजरातचा दिल्लीवर ७ गड्यांनी दणदणीत विजय | गुणतालिकेत अव्वल

**अहमदाबाद, दि. १९ :**



जोस बटलरची ९७ धावांची खेळी अन् राहुल तेवतियाचे अखेरच्या षटकातील फटकेबाजी अन् गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ७ विकेट्सने आणि ४ चेंडू शिल्लक ठेवत पराभव केला आहे. या विजयासह गुजरातच्या संघाने आयपीएलमध्ये पहिल्यांदाच २०० अधिक धावांचे लक्ष्य गाठले आहे आणि आयपीएल २०२५ च्या गुणतालिकेत पहिल्याच स्थानी पोहोचला आहे.

दिल्लीने प्रथम फलंदाजी करत दिल्लीला २०४ धावांचे आव्हान दिले होते. गुजरात संघाने हे आव्हान १९.२ षटकांत ३ विकेट्स गमावत पूर्ण केले. जोस बटलरचे अवघ्या ३ धावांनी शतक हुकले आहे. पण संघाला मात्र त्याने विजय मिळवून दिला आहे. दिल्लीसाठी गेल्या सामन्यात हिरो ठरलेला मिचेल स्टार्क या सामन्यात मात्र पराभवाचे कारण ठरले. स्टार्क या पूर्ण सामन्यात फ्लॉप होता.

मिचेल स्टार्क हा दिल्ली कॅपिटल्सचा मॅचविनर खेळाडू आहे, पण या सामन्यात मात्र तो पूर्णपण फ्लॉप दिसला. स्टार्कने त्याच्या ४ षटकांच्या स्पेलमध्ये म्हणजेच ३.२ षटकांत ४९ धावा दिल्या पण एकही विकेट मिळवली नाही. स्टार्कच्या १५ व्या षटकात बटलरने त्याची धुलाई करत २० धावा केल्या. यामध्ये बटलरने सलग पाच चौकार लगावत सामन्याचा रोख आपल्या बाजूने वळवला. शेरफन रूदरफोर्ड आणि जोस बटलर यांची जोडी तोडण्यासाठी स्टार्कला पाचारण केले होते, पण त्याने १५व्या षटकात २० धावा देत सामना गुजरातच्या बाजूने वळवला. तर स्टार्कच्या अखेरच्या षटकातील पहिल्या दोन चेंडूवर राहुल तेवतियाने षटकार चौकार लगावत सामना फिरवला. गुजरातची सुरूवात धावांचा पाठलाग करताना चांगली झाली होती पण शुबमन गिल ७ धावांवर धावबाद झाला. साई सुदर्शनने २१ चेंडूत ५चौकार आणि एका षटकारासह ३६ धावा केल्या तर जोस बटलरने ५४ चेंडूत ११ चौकार आणि ४ षटकारासह ९७ धावांची खेळी केली. बटलरचे शतक ३ धावांनी हुकले. यंदाच्या आयपीएल ९७ धावांवर नाबाद राहणारा बटलर अजून एक खेळाडू ठरला. तर शेरफेन रूदरफोर्डने बटलरला चांगली साथ दिली. तो ४३ धावा करत बाद झाला. तर राहुल तेवतियाने अखेरच्या षटकात येताच १ चौकार - षटकार लगावत गुजरातचा विजय निश्चित केला.

दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करत २०३ धावांचा डोंगर उभारला. दिल्लीच्या सर्व फलंदाजांनी या मोठ्या धावसंख्येसाठी धावांचे योगदान दिले. अभिषेक पोरेल १८ धावा, करूण नायर ३१ धावा तर केएल राहुलने २८ धावांचं योगदान दिलं होतं. यानंतर कर्णधार अक्षर पटेल आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी अर्धशतकी खेळी करत संघाच्या धावसंख्येत मोठी भर घातली. अक्ष पटेल ३९ धावा करत माघारी परतला.

तर ट्रिस्टन स्टब्सची वादळी खेळी ३१ धावांवर संपली. तर आशुतोष शर्मा याने पुन्हा आपल्या वादळी खेळीने प्रभावित केले. आशुतोषने १९ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ३७ धावांची खेळी केली. यासह अखेरच्या चेंडूवर कुलदीप यादवने चौकार लगावत संघाल २०० धावांचा टप्प गाठून दिला.

प्रसिध कृष्णाने ४ षटकांत ४१ धावा देत ४ विकेट्स घेतले. तर सिराज, अरशद खान, इशांत शर्मा आणि साई किशोर यांनी १-१ विकेट घेतली. साई किशोरला या सामन्यात १ अखेरचे षटक टाकण्याची संधी मिळाली आणि त्याने त्या षटकात विकेट मिळवली.

# चिखली येथे सत्यम शिवम सुंदरा कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. १९ :** श्री महादेव देवस्थान चिखली येथे आयोजित 'सत्यम शिवम सुंदरा' या भव्य नृत्यसंगीत कार्यक्रमाने भक्ती, कला आणि संस्कृतीचा अद्वितीय संगम साधला. भरतनाट्यम वर आधारित नृत्यआकृती प्रभोधिनीच्या वतीने सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने भगवान शिवाच्या दैवी स्वरूपाची त्रिसूत्री- सत्य (सत्यम), मंगलमयता (शिवम) आणि सौंदर्य (सुंदरा)-याची सखोल मांडणी केली.

या अनोख्या सादरीकरणात ७० कलाकारांनी ११ भागांमध्ये विभागलेल्या नृत्यसंगीतात्मक सादरीकरणात भाग घेतला. नृत्य, संगीत आणि प्रतीकात्मकतेच्या माध्यमातून भगवान शिवाच्या विविध



रूपांचे व कथा प्रसंगांचे अप्रतिम दर्शन घडविण्यात आले. पारंपरिक रचनांपासून ते आधुनिक कलात्मक सादरीकरणांपर्यंत विविधतेचा एक अद्वितीय संगम पाहायला मिळाला. कार्यक्रमाची संकल्पना आणि नृत्यदिग्दर्षन आकृती प्रदीप ताम्हणकर यांनी केली होती.

या कार्यक्रमात सान्वी गुरव, स्वरा शानबाग, स्निग्धा बोरकर, अनन्या फाटक, हीरा चौव्हाण, गौरी गाळवे, अदिती घोंगे, यश्वी नाईक, नतिक्षा नाईक, श्रिया नाईक, निया गावंकर, बिंदिया क्षेत्री, रितिका नाईक, क्रिती नाईक, अद्विजा नाईक, समृद्धी नाईक, रिद्धी बांदोडकर, पुण्यायी बांदोडकर, माही दुगल, अद्वेता पाटील, पूजा मौर्य, प्रत्यूषा कोरगावंकर, सान्वी देविदास नाईक, आराध्या नाईक, स्वरा नाईक, सावी नाईक, आरुषी वस्त, ध्रुती अगरवाडेकर, अनिका निगळे, आराध्या करमळकर, गाथा नार्वेकर, रुचिता वेळीप, अवनी कोठारकर, प्राची कुरलेकर, स्वरा मेस्त्री, विभा जाधव, आर्वी सांगले, नविका नाईक, श्रेया कुमार, अवनी गावडे, नेहरिका मोराय, ब्रांची दास, कायरा कांबळे, निधी नाईक, सयुक्ता नाईक, नवीता नाईक, आयुषी शिरोडकर, त्रिशा राजबोंगशी, यश्वी बोरकर, सान्वी अमित नाईक, शुभ्रा राणे, अदिती केरकर, आर्या शेटकर, स्वरा शिंदे, अवनी सारवे, अक्षरा मदकत्ती, कीर्तिका बोरकर, युक्ती वेरलेकर, सिनाया नाईक, जैश्वी नाईक, माही परब, बर्षारानी मुदूली, प्रणाली वेळीप, हस्ती पटेल, सान्वी पाटील, साईशा नाईक यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. कार्यक्रमात श्री महादेव देवस्थान समितीचे अध्यक्ष रत्नाकर पारसेकर, सरचिटणीस दत्तराज गांवस, कोषाध्यक्ष सुदेश नाईक, उपाध्यक्ष भगवान आरोलकर तसेच सदस्य साईश नाईक उपस्थित होते.



वेंगुर्ला : दिंडी सादर करताना बाबू गडेकर. सोबत अनिल पंडित, शितल पालयेकर, राघवेंद्र नाईक व कलाकार.

# वेंगुर्ल्यात बोगदेश्वर पथकाची दिंडी बहरली

■ टीम दैनिक हेराल्ड

**दाभोली, दि. १९ :** महाराष्ट्रातील दाभोली वेंगुर्ल्यात श्रीनारायण देव मंदिरात वास्को मुरगाव गोवा येथील दिंडीसम्राट बाबू गडेकर यांच्या श्रीदामोदर बोगदेश्वर दिंडी पथकाची ६४०वी दिंडी बहरली. स्थानिक मंदिर समितीतील सर्व सभासद मंडळींकडून बाबू गडेकर व पथकातील कलाकारांचीप्रशंसा करण्यात आली. दिंडीची सुरुवात श्रीगणपती मंदिरातून करण्यात आली. तसेच तेथील भागातील गावात वळसा घालून दिंडी श्रीदेव नारायण मंदिरात विसर्जित करण्यात आली. स्थानिक सुहासीनी महिलांनी डोक्यावर कळस घेऊन अनवाणी पायांनी दिंडी मिरवणुकीत भाग घेतल्यामुळे दिंडी आणखीन बहरली. गडेकर हे दिंडीचे प्रमुख गायक होते त्यांनी नवीन रचून गायीलेले गजर दाभोली वासीयाना मंत्रमुग्ध करून गेले, त्यानां साथी गायक म्हणून शीतल पालयेकर, अनिल पंडित, समीर गडेकर व संतोष मोरुडकर साथ देण्यासाठी उपस्थित होते.

पखावजसाथ राघवेंद्र सुर्या नाईक, यश पालव, प्रदीप मांद्रेकर, मयांक अनिल पंडित, व दर्शन सोपटे यानी केली. दिंडीत फेर धरण्यासाठी अनिरुद्ध अनिल पंडित, श्रृती पालव, सचिन गडेकर, रामचंद्र शिरसाट, प्रभाकर मांद्रेकर, भाग्यश्री गडेकर, सुषमा कोचरेकर, अविनाश नाईक, धनंजय नाईक, भुवनेश्वरी अनिल पंडित, श्रीमती विर्नोडकर, स्नेहा तळेकर व इतर अनेक बाल कलाकार, महिला व पुरुष कलाकारांनी दिंडीत उत्साहाने फेर धरला होता. प्रोफेसर सुदेश गांवकर यांनी गळ्यात विणा व हातात चिपळी घेऊन संपूर्ण दिंडी मिरवणुकीत अनवाणी पायानी भाग घेतला. श्रीदेव नारायण मंदिरातील आयोजक श्री जोशी यांनी अप्रतिम दिंडी प्रयोग सादर केल्याबद्दल दिंडीसम्राट बाबु गडेकर पथकातील सर्व कलाकारांचे मनःपूर्वक आभार मानले, त्यानंतर महाप्रसादाने दिंडीची सांगता झाली.

# साळ पुनर्वसन शाळेला 'ऊर्जा' उपक्रमांतर्गत सन्मान

■ टीम दैनिक हेराल्ड

**केरी, दि. १९ :** 'जैवविविधता डायरी' प्रकल्पासाठी ५० हजार रुपयांची मदत, गोव्यातून एकमेव शाळेची निवड डिचोली तालुक्यातील सरकारी प्राथमिक विद्यालय, पुनर्वसन - साळ या शाळेने जैवविविधता संवर्धनासाठी 'ऊर्जा' उपक्रमांतर्गत उल्लेखनीय सन्मान मिळवला आहे. महाराष्ट्र आणि गोवा राज्यांतील ५०० हून अधिक शाळांमधून केवळ १३ शाळांची निवड करण्यात आली असून, गोव्यातून साळ पुनर्वसन शाळा एकमेव शाळा ठरली आहे.

'ऊर्जा' उपक्रम लिटल प्लॅनेट फाउंडेशन आणि ऊर्जा यांच्या संयुक्त



विद्यमाने राबविण्यात येतो. हा उपक्रम जैवविविधता संवर्धनासाठी प्रयत्नशील शाळा आणि शिक्षकांचा गौरव करणारा उपक्रम आहे.

साळ पुनर्वसन शाळेत जैवविविधता डायरी हा अभिनव प्रकल्प राबविण्यात येत असून, विद्यार्थ्यांमार्फत साळ गावातील वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक, सरीसृप, पाणथळ क्षेत्रे व पर्यावरणीय बदलांची माहिती संकलित केली जात आहे. या प्रकल्पासाठी शाळेला ५०,००० रुपयांची मदत प्रदान करण्यात आली आहे.

या उपक्रमाचे नेतृत्व शिक्षक संकेत नाईक करत असून, त्यांना पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. पर्यावरण शिक्षणातील प्रयोगशीलतेचे आणि शिक्षकांच्या समर्पणाचे हे उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे.

शाळेच्या या यशस्वीतेसाठी प्रभारी मुख्याध्यापक धाकटू पाटील, शिक्षिका स्मिता राऊळ व सुवर्णा गावकर यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. यासोबतच शाळा व्यवस्थापन समिती, विवेकानंद पर्यावरण जागृती फौज (केरी, सत्तरी) व वनश्री फाउंडेशन (सिंधुदुर्ग) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संकेत नाईक यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरणीय जागृतीसाठी उपक्रमांची मालिका गेल्या पाच वर्षांपासून शाळेत रुजू झाल्यानंतर शिक्षक संकेत नाईक यांनी पर्यावरण जागृती व संवर्धनासाठी विविध उपक्रमांची मालिका राबवली आहे. यात सिडबॉल निर्मिती, रोड किल सर्वेक्षण, पक्षी निरीक्षण व सर्वेक्षण, नदीकाठ वर्ग, वृक्षदिंडी, वृक्षबंधन, निसर्ग भ्रमंती, सायकल प्रवास, राशी - नक्षत्र वन, चैत्र पालवी उत्सव, माटोळी - निसर्गाचा आगळ, देवराई भेट यांसारखे उपक्रम समाविष्ट आहेत. या सर्व उपक्रमांनी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयी जागरूकता निर्माण केली असून, ही शाळा पर्यावरण शिक्षणात एक प्रेरणादायक उदाहरण म्हणून उदयास आली आहे.

गोव्यातील शाळेला महाराष्ट्रातील प्रतिष्ठित असा पुरस्कार प्राप्त होणे, ही राज्यासाठी आणि शाळेसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. याबद्दल शिक्षक संकेत नाईक यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सहभागाने व स्थानिक संस्थांच्या सहकार्याने हे यश शक्य झाले. भविष्यातही, असे उपक्रम सुरू ठेवणार आहोत.



# पेडणे अग्निशमन दलातर्फे चित्रकला स्पर्धा

टीम दैनिक हेराल्ड


पेडणे, दि. १९ : पेडणे अग्निशमन दलाच्यावतीने पेडणे तालुक्यातील विद्यार्थ्यांना आपत्कालीन प्रशिक्षण देण्याच्या हेतूने चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत जवळपास ८० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या चित्रकला आयोजन स्पर्धे मागील एवढाच हेतू असतो की, आपत्कालीन परिस्थितीच्या वेळी मुलांनी व पालक वर्गाने त्या आपत्कालीन परिस्थितीवर कशी मात करावी त्यापासून स्वतःचा जीव व इतर शेतकऱ्यांचा जीव कसा वाचवावा याचे त्यांना प्रशिक्षण मिळावे यासाठी खास करून ही स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते.

या स्पर्धेचे आयोजन शनिवारी सकाळी ९ वाजता पेडणे येथील सरकारी शाळेत पेडणे अग्निशामक दलाचे अधिकारी नामदेव परवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तसेच यावेळी अग्निशमन दलाचे जवान विष्णुदत्त परब, बया वरक व इतर सहभागी तेजस्विनी साळगावकर जयराम नाईक हे उपस्थित होते. यावेळी ऊख ऊमा बागकर तसेच सरकारी शाळेच्या शिक्षिका सिमा भगत व श्वेता सावळे देसाई यांनी खूप मदत केली.

# घरच्या मैदानावर बंगळुरूचा पराभव

## पंजाब किंग्सचा ५ विकेट्सने विजय

बंगळुरू, दि. १९ : पंजाब किंग्सने आयपीएलच्या १८ व्या मोसमातील ३४ व्या सामन्यात होम टीम रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुवर घरच्या मैदानात ५ विकेट्सने मात केली आहे. आरसीबीने पंजाबला विजयासाठी १४ ओव्हरमध्ये ९६ धावांचे आव्हान दिले होते. पंजाबने हे आव्हान १२.१ ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून सहज पूर्ण केले. पंजाबने ९८ धावा केल्या. उभयसंघात १४ षटकांचा सामना खेळवण्यात आला. पावसामुळे सव्वा २ तासांचा खेळ वाया गेल्याने ६-६ ओव्हर कापण्यात आल्या. तसेच पंजाबचा हा या मोसमातील पाचवा विजय ठरला. पंजाब या मोसमात ५ सामने जिंकणारी दिल्लीनंतर दुसरी टीम ठरली.



पाऊस आणि ओल्या खेळपट्टीमुळे सामन्याला ९ वाजून ४५ मिनिटांनी सुरुवात झाली. त्याआधी ९ वाजून ३० मिनिटांनी टॉस झाला. पंजाबने आरसीबीला बॅटिंगसाठी भाग पाडलं.आरसीबीची पंजाबच्या गोलंदाजांसमोर घसरगुंडी झाली. त्यामुळे आरसीबी ५० धावा करणार की नाही? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत होता. मात्र टीम डेव्हिड याने अखेरच्या क्षणी स्फोटक अर्धशतकी खेळी केली आणि आरसीबीची लाज राखली. टीम डेव्हीड याने अर्धशतक केले. त्यामुळे आरसीबीला १४ ओव्हरमध्ये ९ विकेट्स गमावून ९५ धावा करता आल्या.

टीम डेव्हीडने २६ बॉलमध्ये ३ सिक्स आणि ५ फोरसह नॉट आऊट ५० रन्स केल्या. कर्णधार रजत पाटीदार याने २३ धावांचे योगदान दिले. तर या दोघांव्यतिरिक्त एकालाही दुहेरी आकडा गाठता आला नाही. विराट कोहलीसह इतर फलंदाजांनी पंजाबच्या गोलंदाजांसमोर गुडघे टेकले. पंजाबकडून अर्शदीप सिंह, मार्को यान्सेन, युझवेंद्र चहल आणि हरप्रीत ब्रार या चौघांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर झेव्हीयर बार्टलेट याने १ विकेट घेत इतरांना चांगली साथ दिली.

पंजाबने प्रत्युत्तरात ११ चेंडूआधी विजयी आव्हान पूर्ण केले. पंजाबकडून नेहल वढेरा याने सर्वाधिक धावा केल्या. नेहलने ३ सिक्स आणि ३ फोरसह नॉट आऊट ३३ रन्स केल्या आणि पंजाबला विजयी केले. तर मार्कस स्टोयनिस याने २ बॉलमध्ये नॉट आऊट ७ रन्स केल्या. त्याआधी प्रियांश आर्या याने १६ धावांचे योगदान दिले. प्रभसिमर सिंह याने १३ धावा जोडल्या. जोस इंग्लिस याने १४ धावांची खेळी केली. कर्णधार श्रेयस अय्यर याने ७ रन्स केल्या. तर शशांक सिंह १ रन करुन तंबूत परतला. आरसीबीकडून जोश हेझलवूड याने सर्वाधिक ३ विकेट्स मिळवल्या. तर भुवनेश्वर कुमार याने दोघांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २२७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 227 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .